दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : २५६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२८ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

**आजचा सुविचार**

दुःख हे काळानुसार कमी होतं
पण आठवणी कायम राहतात
आणि त्याच आठवणी
रात्री डोळ्यांत अश्रू आणतात...

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

## पालवणी येथे जमीन विकास कामात अडथळे; शेतकऱ्याचा आमरण उपोषणाचा इशारा

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२७, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील पालवणी येथील शेतकरी सुधीर नारायण पालवणकर यांच्या मालकीच्या जमिनीवरील विकास कामात स्थानिकांकडून वारंवार अडथळे निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. संबंधित प्रकारामुळे आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण झाल्याचे सांगत त्यांनी मे शेवटच्या आठवड्यात तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

पालवणी (रोहिदासवाडी) येथील भूमापन क्रमांक १०/२ मधील सुमारे ४० गुंठे क्षेत्र त्यांच्या मालकीचे असून, त्या ठिकाणी ते अनेक वर्षे वनआधारित शेती करत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून आंबा व काजू लागवडीसाठी जमीन विकसित करण्याचे काम सुरू केले आहे. यासाठी त्यांनी मंडणगड भूमीअभिलेख कार्यालयामार्फत हद्द कायम मोजणी करून घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

मात्र, २८ मार्च २०२६ रोजी झाडझुडपे काढणे व कूपनलिका खोदकामासाठी यंत्रणा आणली असता, स्थानिक ग्रामस्थ मंगेश हरिश्चंद्र पालवणकर, विजय धोत्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कामगारांना अडवून काम थांबवले. यावेळी त्यांच्या नातेवाईकांशी वाद घालून शिवीगाळ व धक्काबुक्की करण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी यापूर्वीही तंटामुक्त ग्राम समिती, मंडणगड पोलीस ठाणे तसेच तहसील व पंचायत समितीकडे तक्रारी दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. ५ मार्च २०२६ रोजी संबंधितांविरुद्ध अदखलपात्र गुन्हाही नोंदविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

घटनेनंतर पोलिसांच्या मध्यस्थीने दोन्ही बाजूंना १ एप्रिल रोजी कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, पालवणकर यांनी उपस्थिती लावली असताना दुसरी बाजू हजर राहिली नसल्याचे त्यांनी सांगितले.

माझ्याकडे जमिनीचे सर्व कायदेशीर पुरावे असूनही मला शेती करण्यापासून रोखले जात आहे. प्रशासनाकडून योग्य ती कारवाई होत नसल्याने संबंधितांना कायद्याचे भय उरलेले नाही, असे पालवणकर यांनी म्हटले आहे.

तसेच, संबंधित व्यक्तींनी ग्रामपंचायतीकडे चुकीची कागदपत्रे सादर करून घरपट्टी नोंद केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

दरम्यान, स्थानिक शेतकऱ्यांना प्रशासनाकडून सहकार्य मिळत नाही, मात्र बाहेरील गुंतवणूकदारांना तत्काळ मदत केली जाते, अशी खंत व्यक्त करत त्यांनी न्याय न मिळाल्यास कुटुंबासह आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

या प्रकरणी प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास

### 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे १ मे ला उद्घाटन




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील, असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात हलकी वाहने आणि बसांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.

सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला ॲक्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली. आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.


अशा प्रकारचे प्रकल्प हे केवळ रस्ते नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे असतात. कनेक्टिव्हिटी मजबूत असेल तर उद्योग, आयटी, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात, असे शिंदे यांनी सांगितले.

पुढील काळात समृद्धी महामार्ग, कोकण कोस्टल रोड, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना जोडून राज्यात ॲक्सेस कंट्रोल रस्त्यांचे जाळे उभारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील कोणत्याही कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात ७ ते ८ तासांत पोहोचता येईल, अशी सक्षम दळणवळण व्यवस्था उभारत आहोत, असे त्यांनी सांगितले.

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून हा प्रकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा ठरणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी नगरसेवक आबासाहेब बागुल, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि एमएसआरडीसी, एफ्कॉन आणि नवयुग कंपनीचे सर्व प्रमुख अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.

## सूर्य ओकतोय आग अन् गुलमोहर पसरवितोय चैतन्य !



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२७, सोलापूर :** सध्या दक्षिण तालुक्यात सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून तापमानाचा पारा ४३ अंशांवर जाऊन पोहोचला आहे. रणरणत्या उन्हामुळे धरणीमाता होरपळून निघत आहे, रस्ते ओस पडले आहेत आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. सर्वत्र भकास वातावरण असताना, निसर्गाची एक अनोखी किमया मात्र सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ती किमया म्हणजे रखरखत्या उन्हात डौलाने उभा असलेला आणि लाल-केशरी, पिवळ्या रंगाने न्हाऊन निघालेला गुलमोहर !

दक्षिण तालुक्यात एप्रिल अखेरच मे महिन्याच्या झळा बसू लागल्या आहेत. ४३अंशांच्या तापमानामुळे ग्रामीण भागातील ओढे-नाले कोरडे पडले असून, शेतशिवारातील हिरवळ हरवली आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, जनावरांना मिळेना चारा, अन् ४३ अंशांचा पारा अशी अवस्था झाली आहे. दुपारी १२ नंतर रस्ते निर्मनुष्य होत असून उन्हाच्या तीव्र लाटांमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा या शुष्क आणि भकास वातावरणात रस्त्याच्या कडेला किंवा शेतात उभा असलेला गुलमोहर सध्या निसर्गाचा हिरो ठरत आहे. जेव्हा इतर झाडांची पाने उन्हाने करपून गळून पडतात, तेव्हा गुलमोहर मात्र उन्हाशी दोन हात करत आपल्या फांद्यांवर फुलांचे ओझे मिरवतो. हा बहर जणू काही सांगत आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्दीने फुलणे थांबवायचे नसते.

**वाटसरूंना दिलासा!**

मंद्रूप परिसरातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी हा बहरलेला गुलमोहर म्हणजे वाळवंटातील 'ओएसिस' ठरत आहे. उन्हाने डोळे दिपत असताना अचानक समोर येणारा हा केशरी-लाल , पिवळ्या रंगाचा वृक्ष मनाला उभारी देतो. कडक उन्हात सावली देण्यासोबतच, या झाडाच्या फुलांचा सडा रस्त्यावर पडल्याने प्रवासाचा थकवा काही क्षणांसाठी का होईना, नक्कीच दूर होतो.

**निसर्गाचा अनोखा विरोधाभास**

एकीकडे पशुपालक जनावरांच्या हिरव्या चाऱ्यासाठी पायपीट करत आहेत, तर दुसरीकडे हा वृक्ष निसर्गाचे वैभव टिकवून धरत आहे. हा एक विचित्र पण सुंदर विरोधाभास आहे. जिथे जीवन जगण्यासाठी पाणी अपुरे पडत आहे, तिथे हा वृक्ष पूर्ण जोमाने फुलून सृष्टीचे सौंदर्य अबाधित राखत आहे.

**निसर्गाची शिकवण !**

निसर्ग आपल्याला संकटातही लढायला शिकवतो दक्षिण तालुक्यात सर्वत्र झाडे वाळली असताना हा गुलमोहर ज्या जिद्दीने फुलला आहे, ते पाहून उन्हाचा त्रास विसरून डोळ्यांना सुखद गारवा मिळतो, अशी प्रतिक्रिया स्थानिक निसर्गप्रेमींनी यांनी दिली.

## धाराशिवमध्ये शिवभक्त आक्रमक !

## धीरेंद्र कृष्ण शास्त्रींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**अक्षराज : संगिता वनकळस**

**दि.२७, धाराशिव :** छत्रपती शिवाजी महाराजांविषयी कथित अवमानास्पद वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ धाराशिव शहरातील शिवभक्त आज आक्रमक झाले. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर) यांच्यावर देशद्रोहासह कठोर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

शिवभक्तांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे अधिष्ठान असून त्यांच्या विषयी होणारा प्रत्येक अवमान हा महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला असल्याचे नमूद करण्यात आले. महाराजांविषयी अवमानास्पद, असभ्य आणि इतिहासाचा विपर्यास करणारी विधाने सहन केली जाणार नाहीत, असा इशाराही देण्यात आला.

निवेदनात धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी सार्वजनिक कार्यक्रमात केलेल्या वक्तव्याचा निषेध नोंदवित संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. तसेच यापूर्वीही राहुल सोलापूरकर, भगतसिंह कोशारी, जैन मुनि कोरडकर, छिंदम यांच्यासह विविध व्यक्तींनी शिवरायांविषयी आक्षेपार्ह विधाने केल्याचा उल्लेख करण्यात आला. अशा प्रवृत्तींवर कारवाईचा अभाव असल्याने त्यांना जणू मोकळे रान मिळत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच बागेश्वर बाबाला कोल्हापुरी चप्पलने मारहाण केल्यास शिवभक्तांकडून १ लाख ५१ हजारांचे बक्षीस जाहीर करण्यात आले

याचबरोबर आमदार संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या लेखकाविषयी वापरलेल्या कथित अर्वाच्य भाषेचाही निषेध करण्यात आला.



लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक जीवनात संयमित व जबाबदार भाषा वापरावी, अशी मागणी शिवभक्तांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून त्यांच्या नावावरून समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. भविष्यात महाराष्ट्राच्या महापुरुषांविषयी कोणीही अवमानास्पद वक्तव्य करणार नाही, यासाठी शासनाने कठोर धोरण जाहीर करावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले.

दरम्यान, या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री कार्यालय तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयालाही देण्यात आली.

या निषेध आंदोलनास धनंजय शिंगाडे, बलराज रणदिवे, उमेश राजेनिंबाळकर, अभिजीत सूर्यवंशी, प्रवीण सूर्यवंशी, रोहित पडवळ,ॲड.धैर्यशील सस्ते,आकाश मुंडे,संजय मुंडे,शेखर घोडके,धनंजय राऊत,ॲड.मनिषा पाटील,सुमती तोरमाले,

अमर माळी,अभिषेक बागल,पृथ्वीराज चिलवंत,राजाभाऊ साळुंके,शेषराव उंबरे,सुनील आंबेकर,राजकुमार भोसले,सुमित बागल,पंकज भोसले,संतोष घोरपडे,रोहित बागल,ओमकार लाकाळ,धनंजय शहापुरे,प्रशांत कांबळे,इलियास मुजावर,उस्मान कुरेशी,दादा सूर्यवंशी,वीरेंद्र घोगरे,दादा सूर्यवंशी,अमोल सूर्यवंशी,शरद पडवळ,सुरज वडवले,आयाज शेख,कुणाल कर्णवर,अंकुश पेठे त्यांचे सह आधी शिवभक्त मोठ्या संख्येने सामील झाले होते.

## उदगीर जळकोट मतदारसंघातील शेतकऱ्यांवर अन्याय ; लातूर जिल्ह्याला मदतीतून वंचित ठेवण्याचा प्रकार

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि२७, उदगीर (लातूर) :** खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यभरात पिकनुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी जवळपास ₹१२०० कोटींची मदत जाहीर करण्यात आली. यापैकी सुमारे ₹८०० कोटींची मदत नांदेड जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना वितरित झाली आहे. हे स्वागतार्ह असले तरी, त्याच भौगोलिक पट्ट्यातील आणि समान आपत्तीला सामोरे गेलेल्या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर मात्र गंभीर अन्याय झाला आहे.

उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. विशेषतः बोरगाव, चांदेगाव या भागांमध्ये केवळ शेतीच नव्हे तर नागरिकांची घरे व पशुधन यांचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. अशा गंभीर परिस्थितीत तातडीने व पुरेशी मदत मिळणे अपेक्षित होते.

परंतु दुर्दैवाने, लातूर जिल्ह्यात महायुतीचे पाच आमदार असतानाह ज्यामध्ये एका कॅबिनेट मंत्र्याचाही समावेश आहे . स्थानिक शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. नांदेड जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात मदत मिळत असताना, लातूर जिल्ह्याला तितक्याच तीव्रतेने नुकसान होऊनही मदतीपासून वंचित ठेवणे हे अत्यंत अन्यायकारक व निषेधार्ह आहे.

ही परिस्थिती पाहता, लातूर जिल्ह्यातील जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, स्थानिक लोकप्रतिनिधींनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात अपयश आल्याचे स्पष्ट दिसून येते. सत्तेत असूनही शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरणे हे गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

उदगीर तालुक्यातील शेतकरी पिकविम्याच्या प्रश्नासाठी सातत्याने आंदोलने करीत आहेत, तरीपण या गोष्टीची गांभीर्याने दखल घेतली गेली नाही, यामुळे आता शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आम्ही हा प्रश्न तीव्रतेने मांडत राहू आणि आवश्यक असल्यास आंदोलनाचा मार्गही स्वीकारू असे जनतेतुन बोले जात आहे.

अक्षराज






## न्याय नाहीच, कलंक तरी मिटवा!

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच अर्थात २००१ मध्ये झालेली दंगल, त्यानंतर २००६ चे साखळी बॉम्बस्फोट आणि पाठोपाठ २००८च्या स्फोटाने मालेगावनामक मुस्लिमबहुल शहराकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले गेले. तसे त्याआधी शे-सव्वाशे वर्षांत अनेकदा घडलेला हिंदू-मुस्लिम जातीय संघर्ष आणि काही चांगल्या गोष्टींमुळेसुद्धा हे शहर चर्चेत होतेच. मालेगावची ओळख संवेदनशील वा स्फोटक शहर म्हणून निर्माण होण्यामागे आजवर क्षुल्लक कारणांवरून झालेला धार्मिक संघर्षाचा इतिहासच कारणीभूत आहे. १९२१ साली खिलाफत चळवळीच्या निमित्ताने या शहरात २० व्या शतकातील पहिली दंगल झाली. मालेगाववर दंगलींचे शहर हा शिक्का लागला तो १९६७ साली. गोहत्या हे त्या संघर्षाचे कारण ठरले होते. त्यानंतर अगदी २००० च्या दशकांपर्यंत या शहराने दंगली अनुभवल्या. त्यामुळे शहर बदनाम होत गेले, तसे बकालसुद्धा.

प्रत्येक संघर्षाने इथल्या पिढ्यांना कित्येक वर्षे मागे नेले. आजही अठराव्या शतकातच जणू हे शहर असल्याचे दिसते. शेवटची दंगल झाली ती २००१ मध्ये दसऱ्याच्या दिवशी. दुर्दैवाने धार्मिक विखाराची चूल सदैव पेटती राहिल्याने इथल्या मातीतल्या चांगल्या गोष्टी वारंवार भस्मसात होत राहिल्या. समाजवादी विचारधारेची रुजवात करणारे समाजधुरिण ते हातमाग कामगारापर्यंतचा हरेक घटक होरपळला. त्यामुळे मालेगाववासीयांना दुर्लौकिकचे धनी व्हावे लागले. याला केवळ दैवदुर्विलास म्हणायचे की आपले प्राक्तनच फुटके होते, या विचाराने येथील जनता मनातल्या मनात कुढत असल्याचे जाणवते. आजही ती त्याच अवस्थेत मौन धारण करून आहे. मुंबई उच्च न्यायालयाने २००८ च्या साखळी बॉम्बस्फोटांचा ताजा निकाल देताना चार हिंदू आरोपींची सक्षम पुराव्यांअभावी मुक्तता केली, तरी या शहराने काहीच प्रतिक्रिया नोंदवली नाही, हे विशेष! एरव्ही जणू ज्वालामुखीच्या उद्रेकावर असणाऱ्या या शहरात फट् आवाज आला तरी ते पेटून उठायचे. अर्थात, दोन्ही बॉम्ब स्फोटांनंतर तणावाच्या वातावरणातसुद्धा या शहराने कमालीचा संयम बाळगला, तेव्हा कधीकाळी हजारो मैल दूर असलेल्या ओसामा बिन लादेनवरून पेटणारे हेच का ते मालेगाव, असे म्हणत सारेच आश्चर्यचकीत झाले होते. सुपारीच्या खांडावरूनसुद्धा इथे दंगली उसळल्याचा इतिहास अनेकांना स्मरत असेलच. राजकीय स्टंटबाजी आणि त्यातून उद्भवणाऱ्या संघर्षाचा अक्षरश: वीट आल्याने जनता अलीकडे जरा शहाणी झाली असावी.

८ सप्टेंबर २००६ रोजी पवित्र शब-ए-बारातच्या दिवशी भरदुपारी दीड वाजेच्या सुमारास गजबजलेल्या बडा कब्रस्तान व मुशावरत चौकात एकापाठोपाठ चार स्फोट झाल्याने मालेगाव हादरले होते. या स्फोटांत ३१ निरपराध लोक मारले गेले आणि तीनशेपेक्षा अधिक जखमी झाले. त्यानंतर अवघ्या दोन वर्षांत म्हणजे २९ सप्टेंबर २००८ रोजी पुन्हा स्फोट झाले, जे साखळी स्वरूपाचे होते. गजबजलेल्या वस्तीत एका दुचाकीमध्ये ठेवलेल्या 'आरडीएक्स'च्या स्फोटात आठ जणांचा बळी गेला आणि शंभराहून अधिक नागरिक जखमी झाले होते. पैकी काहींना कायमचे अपंगत्व आले. हे लोक आजही त्या घटनेच्या खाणाखुणा अंगाखाद्यांवर बाळगून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, त्याची दखल घ्यायला राजकीय मंडळींना फुरसत नाही. प्रारंभी या स्फोटांचा तपास महाराष्ट्राच्या दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) होता. 'हिंदू अतिरेकी गटांशी संबंधित व्यक्तींनी हे कृत्य केले असावे,' असा निष्कर्ष काढून 'एटीएस'ने साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय आदी सात जणांना अटक केली. देशाच्या राजकारणात गदारोळ माजवणाऱ्या 'भगवा दहशतवाद' या संकल्पनेचा उगमही यादरम्यानच झाला. हे प्रकरण सन २०११ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपविण्यात आले. देशात सत्तांतर झाल्यानंतर या तपासाची दिशा बदलल्याचा आरोप झाला आणि 'एटीएस' व 'एनआयए' या यंत्रणांकडून परस्परविरोधी दावे करण्यात येऊ लागले. 'एटीएस'च्या तपासात दोष असल्याचे सांगून 'एनआयए'ने काही जणांचे पुन्हा जबाब घेतले. सतरा वर्षे चाललेल्या या खटल्यात ३७ जणांनी साक्ष फिरवली. काही पोलिसांचाही त्यामध्ये समावेश आहे. विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी निकालात तपासातील त्रुटींवर बोट ठेवले. पुरोहित यांनी काश्मीरमधून 'आरडीएक्स' आणून बॉम्ब तयार केला, याचे पुरावे आढळले नाहीत; तसेच साध्वी ठाकूर यांच्याकडे स्फोट झालेल्या दुचाकीचा ताबा होता, हेही सिद्ध होऊ शकले नाही. सोबतच संबंधित दुचाकीतच बॉम्ब ठेवला होता किंवा आरोपींच्या बैठका झाल्या, हेही सिद्ध करण्यात यंत्रणा अपयशी ठरल्या. अपुरे तांत्रिक पुरावे आणि काही कागदपत्रांमध्ये छेडछाड झाल्याचेही आढळले.

-- संपत थेटे

# वाहनांवर नियंत्रण आणायला हवे!



साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर पुणेकरांनी जोरदार वाहनांची खरेदी केल्याचे समोर आले आहे. अक्षय तृतीयाच्या आधी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर देखील पुणेकरांनी हजारो वाहने खरेदी केल्याची नोंद आरटीओत करण्यात आली. त्यात इंधनावरील वाहनांच्या सोबतच इलेक्ट्रिक वाहने देखील मोठ्या प्रमाणात पुणेकरांनी खरेदी केल्याचे समोर आले आहे. मागील वर्षापेक्षा या वर्षी वाहन खरेदीची संख्या अधिक आहे. पुणे शहरात वाहनांची संख्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. त्यात आणखी हजारो वाहनांची भार पडली आहे. केवळ पुणे शहरातच एका दिवशी हजारो वाहनांची खरेदी झाली याचाच अर्थ राज्यातील इतर शहरातही वाहनांच्या खरेदीने उच्चांक केला आहे. पुण्यापेक्षा मुंबई ठाणे या शहरात अधिक वाहनांची खरेदी झाल्याची बाब समोर आली आहे. प्रत्येक शहरात साधारणपणे पाच हजार वाहनांची खरेदी झाल्याचे गृहीत धरले तरी हा आकडा खूप मोठा होतो. पुण्याप्रमाणेच मुंबई शहरातही वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चार चाकी आणि दुचाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील रस्ते अपुरे पडू लागली आहेत. शिवाय पार्किंगचीही मोठी समस्या निर्माण झाली आहे. मुंबईत गाड्या पार्क करण्यासाठी फक्त १५ वाहनतळ असून त्यात ९ हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली आहे त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या वाहनांमुळे मुंबई, पुण्यातील प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे पण याची ना कोणाला फिकीर ना खंत. एकेकाळी पुणे शहर हे सायकलींचे शहर म्हणून ओळखले जायचे ती ओळख आता पुसली गेली आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी कमालीची वाढली आहे. प्रदूषणामुळे दिल्लीची काय अवस्था झाली आहे ते आपण पाहतोच आहे, दिल्ली प्रमाणेच इतर शहरांची अवस्था व्हायला नको असेल तर वाहनांवर नियंत्रण आणायला हवे. नवीन वाहने विकत घेण्यापेक्षा बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर नागरिकांनी करायला हवा पण नागरिकांचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर विश्वास नाही. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांना सक्षम सेवा देण्यात अपयशी ठरत आहे. म्हणून जो तो नवीन वाहन घेत आहे. पुण्यामुंबई सारख्या शहरातील वाहनांची संख्या कमी करायची असेल तर बेस्ट, पीएमपीएल सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने आपला कारभार सुधारून नागरिकांना योग्य सेवा द्यायला हवी. बेस्ट, पीएमपीएल यासारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम केल्यास पुण्यामुंबईतील वाहनांच्या संख्येवर नियंत्रण येईल यात शंका नाही.

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# अहिल्यानगरच्या प्रकल्पांतील पाणीसाठा निम्म्यावर

## ४४ हजार लोकांना २० टँकरद्वारे पाणीपुरवठा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, अहिल्यानगर :** उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाने पाणीटंचाईची झळ जिल्ह्याला बसू लागली आहे. धरणातील पाणीसाठा निम्म्यावर आला आहे तर २६ गावे व १२० वाड्यावस्त्यांमधील ४४ हजार १५२ लोकसंख्येला २० टँकरमार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ३ मोठे व ६ मध्यम प्रकल्पातील एकूण ५१ हजार ९३ दलघफू पाणीसाठ्यापैकी २७ हजार दलघफू पाणीसाठा शिल्लक राहिलेला आहे.




जिल्ह्यातील पाणीप्रकल्पामधून सिंचन, औद्योगिक वापरासह पिण्याच्या पाण्यासाठी पाणी उचलले जाते. याशिवाय वाढत्या उन्हाळ्यामुळे बाष्पीभवनाचा वेगही मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. परिणामी प्रकल्पातील पाणी पातळी झपाट्याने घटू लागल्याचे दिसते आहे. मात्र असे असले तरी गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदाच्या जलसाठ्याची परिस्थिती तुलनात्मक चांगली आहे. गेल्यावर्षी याच तारखेला ४२.९३ टक्के जलसाठा होता. यंदा १० टक्क्याहून अधिक जलसाठा शिल्लक राहिलेला आहे.

हवामान विभागाने यंदा पाऊस लांबणार असल्याचे तसेच पाऊसमान कमी राहील असा अंदाज वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाने धरणातील पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन केले आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात अतिवृष्टी झाली होती. पाऊस ही सरासरीपेक्षा अधिक झालेला होता. त्यामुळे सर्व प्रकल्पातून पाणीसाठा चांगला निर्माण झाला होता.

मात्र प्रचंड उपसामुळे पाणीसाठा झपाट्याने खालवू लागला आहे. हवामान खात्याच्या सूचनेनुसार जलसंपदा विभागाने ऑगस्ट अखेर पाणी नियोजन करावे लागेल,असा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात भंडारदरा, मुळा, निळवंडे हे तीन मोठी धरणे आहेत. या तिन्ही प्रकल्पांची एकूण क्षमता ४५ हजार ३५९ दलघफू जलसाठा आहे. सध्या या तीन प्रकल्पातून २४ हजार ४०७ दलघफू जलसाठा आहे. मुळा धरणात ५३.४० टक्के, भंडारदरा धरणात ४९.१९ टक्के तर निळवंडे धरणात ६१.२१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. याशिवाय आढळा, मांड ओहोळ,पारगाव घाटशीळ, सीना, खैरी व विसापूर या सहा मध्यम प्रकल्पांची एकूण क्षमता ५ हजार ७३४ असून सध्या या प्रकल्पांमध्ये एकूण २ हजार ५९६ जलसाठा आहे. आढाळा प्रकल्पात ६१.२३ टक्के,मांड ओहोळ व विसापूर या दोन प्रकल्पात अनुक्रमे २०.१६ व २२.६८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

### ४४ हजार लोकसंख्येची तहान टँकरवर !

उन्हाच्या झळा वाढू लागल्याने जिल्ह्यातील २६ गावे,१२० वाड्यावस्त्यांना २० टँकरमार्फत पाणीपुरवठा केला जात आहे. टँकरद्वारे एकूण ४४ हजार १५२ लोकसंख्येची तहान भागवली जात आहे. गेल्या वर्षी याच तारखेला जिल्ह्यात ७६ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत होता. सध्या पाणीपुरवठ्यासाठी ११ विहिरी व कुपनलिका अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. तिथून टँकरसाठी पाणी भरले जाते.

---

सर्वाधिक पारनेर तालुक्यात ९ गावे ८० वाड्यावस्त्यांना ८ टँकरद्वारे २० हजार ५०० लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जात आहे. संगमनेरमध्ये १२ गावे,२२ वाड्यावस्त्यांना ८ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. तेथील १६ हजार ८०४ लोकसंख्येची तहान टँकरद्वारे भागवली जात आहे. अहिल्यानगर तालुक्यातील ३ गावे,१२ वाड्यांना ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. अकोले तालुक्यात १ टँकर सुरू आहे.

## मनासारखा

उद्रेक उसळे मनोमन
निर्णय न मनासारखा
कायझाले गौडबंगाल
विचार घोंगावेसारखा

पराभूत पक्केखेळाडू
जिंकून आला नवखा
संशयात ग्रासले चित्त
प्रकार घडतो किवखा

कोलमडू पाडे अंदाज
बदलला डाव अख्खा
आखाड्या घडे भलते
कोसळू पडे आडाखा

आदेश आलेले वरतून
व्यूहरचना नीट आखा
पश्चात्ताप निरूपयोगी
पराजयाचीफळेचाखा

मूळ समूळ उखडलेले
राबल्या प्रत्येक शाखा
पायात लटलट चालते
सांभाळत बसा शिखा

एकच हातात उरलेले
संयम नि सबुरी राखा
लक्ष्य येवूदे आटोक्या
निशाणा अचूक रोखा

– हेमंत मुसरीफ, पुणे.
९७३०३०६९९६

अक्षराज अचूक अचूक बातमी

# खासदार प्रतिभा धानोरकर संतापल्या, 'पैसा जातो कुठे?'

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** जिल्ह्याचा आरोग्य कणा असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची विदारक अवस्था पाहून खासदार प्रतिभा धानोरकर यांनी प्रशासनाचे चांगलेच वाभाडे काढले. गुरुवारी दुपारी त्यांनी रुग्णालयाला दिलेल्या 'आकस्मिक भेटी' दरम्यान धक्कादायक वास्तव समोर आले. जिल्ह्याचे तापमान ४० अंशाच्या पार असतानाही रुग्णांच्या नातेवाईकांसाठी साधे कुलर नसणे, पिण्याच्या पाण्याची दयनीय अवस्था आणि कर्तव्यावर असलेले वैद्यकीय अधिकारी गायब असल्याचे पाहून खासदारानी अधिष्ठातांसह उपस्थित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. रुग्णालयातील स्वच्छतेवर दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करुन ही प्रत्यक्षात मात्र सगळीकडे घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी पसरली आहे. फुटलेल्या नालेया, महिला प्रभागातील तुंबलेली घाणेरडी स्वच्छतागृहे यामुळे रुग्णांचे आरोग्य सुधारण्याऐवजी अधिकच धोक्यात आले आहे. स्वच्छतेचा पैसा जातो कुठे? असा जळजळीत सवाल करत, महिलांना मिळणारी ही वागणूक आणि आरोग्याशी होणारी तडजोड कदापि सहन केली जाणार नाही, अशा स्पष्ट शब्दात खासदारांनी प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळ कारभारावर प्रहार केला.

या गंभीर समस्यांची दखल घेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी प्रशासनाला ८ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. महिला विभागातील पाणीपुरवठा सुरु करणे, पिण्याच्या पाण्याचा दर्जा सुधारणे आणि संपूर्ण परिसरातील घाण साफ करुन व्यवस्था तातडीने सुधारण्याचे निर्देश त्यांनी दिले. जर ८ दिवसाच्या मुदतीत परिस्थितीत सकारात्मक बदल दिसला नाही, तर प्रशासकीय स्तरावर कठोर कारवाई प्रस्तावित करुन स्वत: रुग्णालयात बसून तीव्र आंदोलन करणेयाचा इशारा त्यांनी यावेळी दिला. या पाहणी दौऱ्यावेळी शहर कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष संतोष लहामगे, महिला जिल्हाध्यक्षा कुंदाताई जेनेकर, नगरसेवक रामनरेश यादव, अनुताई दहेगावकर, यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. खासदारांच्या या आक्रमक भूमिकेमुळे रुग्णालय प्रशासनाचे धाबे दणाणले असून, गरीब रुग्णांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देण्याचा निर्धार खासदार प्रतिभा धानोरकर यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



# ठाणे जिल्ह्यात 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' मोहिमेचा निर्धार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, ठाणे :** जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनाच्या समिती सभागृहात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

या बैठकीस आमदार किसन कथोरे, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार डॉ.बालाजी किणीकर, आमदार शांताराम मोरे, आमदार राजेश मोरे, पालक सचिव नवीन सोना, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, शशिकांत गायकवाड, शिधावाटप उपनियंत्रक भास्कर तायडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, प्रमोद काळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा कृषी विकास अधिकारी मनीर बाचोटीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, तहसिलदार रेवण लेंभे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कोक जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२७, कोक :** ता जिंतूर येथील जिल्हा परिषद मराठी व उर्दू शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. या निवडीत सर्व पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.मराठी शाळेच्या अध्यक्षपदी राजाराम काशिनाथ सोळंके यांची निवड करण्यात आली. तर उर्दू शाळेच्या अध्यक्षपदी गुलाब खान रशीद खान पठाण यांची निवड झाली. तसेच मराठी शाळेच्या उपाध्यक्षपदी शेख रियाज शेख रऊफ आणि उर्दू शाळेच्या उपाध्यक्षपदी सय्यद इलियास सय्यद इकबाल यांची नियुक्ती करण्यात आली. या निवड प्रक्रियेदरम्यान केंद्रप्रमुख लटपटे सर, उर्दू शाळेचे गफार सर, माजी जिल्हा परिषद सदस्य रामेश्वर जावळे, गावचे सरपंच वहिद पठाण, पोलीस पाटील संदीप झाडे यांच्यासह सय्यद एजाज, आतीख खान पठाण, सय्यद सलीम, वसंता रासवे, अक्षय जावडे, अक्षय रासवे, सुरेश भुसारे, शेख रहीम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उर्दू व मराठी शाळेतील सर्व शिक्षक तसेच मोठ्या संख्येने पालकवर्गही उपस्थित होता.निवड प्रक्रियेनंतर नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून शाळेच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## निराधार योजनेचे लाभार्थी अर्थसहाय्य निधी पासून वंचित



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** महाराष्ट्र शासनाची श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचा लाभार्थ्यांना अर्थसहाय्य निधी वाटप करण्याबाबत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सहारे यांच्या मार्फत अतिरिक्त जिल्हाधिकारी अनुप खांडे यांना निवेदन सादर करण्यात आले. नागपूर जिल्ह्यातील श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनेचे गरजू लाभार्थी अर्थसहाय्य पासून वंचित आहेत.

निराधार आणि वंचित वृद्ध नागरिकांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी निराधार ज्येष्ठ नागरिकांना, विधवा, दिव्यांग व इतरही लाभार्थ्यांना मूलभूत गरजा भागविण्यासाठी,त्यांना कोणावरही अवलंबून राहाव लागणार नाही, वृद्ध नागरिकांना आत्मनिर्भर बनविणे, त्यांचा आर्थिक विकास करणे, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अर्थसहाय्य निधी शासनातर्फे देण्यात येतो. परंतु नागपूर जिल्ह्यातील गरजू निराधार लाभार्थ्यांची माहिती घेतली असता, २० हजार लाभार्थी अर्थसहाय्य निधी पासून वंचित आहेत. तहसील व बँकेच्या चकरा मारत लाभार्थी त्रस्त झाले आहेत. त्यांना मूलभूत गरजा भागविणे कठीण झाले आहे. याकरिता या निवेदनाची दखल घेवून गरजू २० हजार लाभार्थ्यांना त्यांचा अर्थसहाय्य निधी मंजूर करून तातडीने वाटप करावा. ही मागणी वंचित बहुजन आघाडी तर्फे निवेदन देवून करण्यात आली. या मागणीची दखल न घेतल्यास पक्षा तर्फे तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. याप्रसंगी निवेदन देताना जिल्हा कार्यालयीन सचिव वैभव येवले, आय.टी. सेल प्रमुख शुभम वाहने उपस्थित होते.

## मुक्रमाबाद येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२७, मुखेड (नांदेड) :** मुक्रमाबाद येथील सिद्धार्थ नगर नालंदा बौद्ध विहार येथे दि.२७ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील नालंदा बौद्ध विहार येथे दि.२७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ठिक १० वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर, राजश्री शाहू महाराज, साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, आदि सर्व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.प्रारंभी सरपंच अंजितातार्इ बोधने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष लोकनेते व्यंकटराव पाटील गोजेगावकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सदाशिव बोयवार, बालाजी पाटील गोजेगावकर, भाजपाचे मुखेड तालुका अध्यक्ष हेमंत खंकरे, शेतकरी संघटनेचे नेते शिवशंकर पाटील कलंबरकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गौसखाँ पठाण, माजी सैनिक व्यंकट सुर्यतळे, पोलिस पाटील व्यंकट सुवर्णकार, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल पटेल, बिट जमादार सुरेश भुताळे, पत्रकार दादाराव गुमडे, विनोद आपटे, युवानेते अतुल सुन्नेवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते मगदुम पठाण. आदिंची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचलन पत्रकार रज्जाक कुरेशी यांनी केले तर आभार राजकुमार गायकवाड यांनी मानले.जयंती कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष सागर वानकर, उपाध्यक्ष अमोल कांबळे, सचिव मनोज गायकवाड, सहसचिव संदीप कांबळे, मार्गदर्शक बालाजी गायकवाड, मार्गदर्शक क्रांती कुमार वाघमारे, राहुल कांबळे, पवन वानकर, संघर्ष गायकवाड, अमोल गायकवाड, शैलेश वानकर, बुद्धभुषण कांबळे, अविनाश गायकवाड, सुनिल कांबळे, अधूनिक फकिरा प्रतिष्ठान ग्रुपचे जगदीप कांबळे, धनाजी बोयवार, विकास बोयवार, अमोल बोयवार,आदि पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत अधीर जुन्नावारने गोल्ड मेडल पटकावले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** स्केटिंग असोसिएशन ऑफ चंद्रपूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत लहानग्या खेळाडूंनी उत्साहात सहभाग नोंदवला. या स्पर्धेत ४ ते ६ वयोगटातील इनलाईन प्रोफेशनल स्केटिंग प्रकारात अधीर जुन्नावार याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि गोल्ड मेडलवर आपले नाव कोरले. अधीरच्या या यशामुळे सर्वत्र त्याचे कौतुक होत असून, त्याच्या मेहनतीला, जिद्दीला आणि सातत्यपूर्ण सरावाला यशाचे सुंदर फळ मिळाले आहे. या यशामागे त्याचे प्रशिक्षक विनोद निखाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे अधीरने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे.

या स्पर्धेचे आयोजन स्केटिंग असोसिएशन चंद्रपूरचे सचिव प्रवीण चवरे यांनी उत्कृष्ट नियोजनातून केले होते. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. यावेळी चंद्रपूरातील प्रसिद्ध डॉक्टर डॉ. सचिन भेदे यांच्या हस्ते अधीर जुन्नावार याला गोल्ड मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या यशामुळे अधीर जुन्नावारच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही तो जिल्हा व राज्यस्तरावर अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे गाठेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी पातळी वॉटरबेल!



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, नांदेड :** शालेय विद्यार्थ्यांनी दररोज पुरेसे पाणी प्यावे, या उद्देशाने राज्याच्या शिक्षण विभागाने सर्व शाळांमध्ये तीन वेळा 'वॉटर बेल' (पाणी पिण्याची घंटा) वाजविण्याचा अध्यादेश काढला होता.

केरळ येथील एका शाळेने राबविलेला 'वॉटर बेल'चा उपक्रम केरळ राज्यातील सर्व शाळांमध्ये राबविला. त्याचे चांगले परिणाम दिसून आल्याने महाराष्ट्रातील शाळांमध्ये सुद्धा वॉटर बेल व्हावी, अशी मागणी समोर आली होती. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा अध्यादेश प्रसिध्द केला.

मात्र पुढील काळात प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. आता जवळ्याच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने वाटरबेल ही संकल्पना वास्तवात आणली आहे. यासाठी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, विषयशिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार हे मार्गदर्शन करीत असून उपक्रमाच्या पहिल्या दिवशी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश गोडबोले, माजी अध्यक्ष किशनराव गच्चे, सरपंच माधव पावडे, माजी सरपंच कमलताई शिखरे, साहेबराव शिखरे, माजी सरपंच कैलास गोडबोले, आनंद गोडबोले, हरिदास पांचाळ, हैदर शेख, मनिषा गच्चे, मारोती चक्रधर आदींची उपस्थिती होती.

उन्हाळ्यात तापमान वाढत असतांना शरीरातील पाण्याची कमतरता हे अनेक आजारांचे कारण बनते. अनेक विद्यार्थी पाण्याची बाटली तशीच परत आणत असल्याचे निदर्शनास आले आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे थकवा येणे, मुतखडा, चिडचिडेपणा वाढणे आदी त्रास होण्याची शक्यता असते. बरेचदा विद्यार्थी खेळण्याच्या नादात पाणी पिण्याचेच विसरून जातात.

त्यांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी शाळेत तीन वेळा वॉटर बेल वाजविली जात आहे. शाळेच्या वेळापत्रकात तीनवेळा वॉटर बेल वाजविण्याबाबत मुख्याध्यापक ढवळे यांनी वेळ निश्चित केली आहे. पुढील काळात विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची सवय लागेल. या वेळेत विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह वापरण्याची मुभा देण्यात येत आहे. जवळ्यात पाणी पिण्याचे महत्व जाणून वॉटर बेल उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्व विद्यार्थी शाळेच्या वेळेत नियोजनाप्रमाणे तीन वेळा पाणी पित आहेत. त्यासाठी ग्राम पंचायतीकडून शाळेत पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

> जिल्ह्याचे तापमान ४३ अंशावर गेले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम ही संकल्पना वास्तवात आणण्यासाठी शाळेतील शिक्षकांशी चर्चा केली. शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी आपल्यासमोर विद्यार्थी भरपूर पाणी पितील आणि पाण्याअभावी होणारे रोग कमी होतील या उद्देशाने सर्वांनी होकार दिला. त्यानुसार सकाळी ८.३० वाजता पहिली घंटा वाजते तेव्हा सर्व विद्यार्थी प्रांगणात जमतात आणि पाणी पितात. असेच सकाळी ९.३० वा आणि शाळा सुटण्याच्या सुमारास स. १०.३० वा तिसऱ्यांदा पाणी पितात. या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होत विद्यार्थी आनंद घेत आहेत.
>
> – गंगाधर ढवळे, मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा. जवळा दे.

# नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२७, नवी मुंबई :** कोणत्याही क्षेत्रात योग्य रितीने मेहनत केल्याशिवाय यश मिळत नाही हे लक्षात घ्या, त्याला बॉक्सिंगचे क्षेत्र सुद्धा अपवाद नाही असे सांगत जागतिक किर्तीच्या बॉक्सिंग चॅम्पियन पद्मविभूषण मेरी कोम यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी बॉक्सिंग खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

सातत्याने सराव, नवनवीन गोष्टी शिकण्याची इच्छा, जिद्द आणि चिकाटी हे अत्यंत महत्वाचे गुण असून एका यशाने समाधानी न होता व एका अपयशाने खचून न जाता सतत खेळत राहणे हाच यशाचा खरा मंत्र असल्याचे त्या म्हणाल्या.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील आणि ऑलिम्पिक पदक विजेत्या सुप्रसिद्ध भारतीय बॉक्सर मेरी कोम यांच्या प्रमुख उपस्थितीत मरिन बॉक्सिंग ॲकेडमी या नामांकित क्रीडा संस्थेच्या वतीने, नवी मुंबई महानगर पालिकेच्या सहयोगाने, नेरूळ सेक्टर ४० येथील नेक्सस सी वूड मॉल मध्ये 'आयबीए ग्लोबल बॉक्सिंग सिरीज' या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती उपआयुक्त अभिलाषा पाटील, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, क्रीडापटू हितेश चौधरी व मरिन बॉक्सिंग अकॅडमीचे प्रमुख देवराज दास आदी मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध खेळांना चांगले व्यासपीठ उपलब्ध करून देऊन खेळांडूमध्ये प्रेरणा निर्माण करण्याचे काम केले जात असल्याचे सांगत महापौर सुजाता पाटील यांनी मेरी कोम यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित बॉक्सिंग चॅम्पियन या स्पर्धेच्या निमित्ताने नवी मुंबईत आल्याने या स्पर्धेची उंची वाढल्याचे सांगितले. यापुढील काळात सर्वच खेळांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध राहून प्रयत्न करण्यात येतील असे त्या म्हणाल्या. याप्रसंगी क्रीडा रसिक व विशेषत्वाने युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभाग निरीक्षक रमेश अडगाळे यांचे प्रशासन उत्तम होते – शिक्षणाधिकारी किरतकुडवे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुलुंड (मुंबई उपनगर) :** मुलुंड 'टी' विभागातील मिठागर सी.बी.एस.ई. शाळेत विभाग निरीक्षक रमेश अडगाळे यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन २५ एप्रिल रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी सर्वभाषिक शाळांचे मुख्याध्यापक, प्रशिक्षक, स्पेशल शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र व बहुसंख्य नातेवाईक उपस्थित होते. विभाग निरीक्षक रमेश अडगाळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून मुंबई महापालिका शिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे, अधीक्षक कैलाशचंद्र आर्य व सेवानिवृत्त मुख्याध्यापक जगन्नाथ कंखर हे उपस्थित होते.

मुंबई महापालिका शिक्षणाधिकारी किर्तीवर्धन किरतकुडवे यांनी सांगितले की, विभाग निरीक्षक रमेश अडगाळे यांचे प्रशासन उत्तम होते. त्यांनी एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या समर्थपणे पेलल्या आहेत. सर्व शिक्षकांशी त्यांचे संबंध चांगले होते.

विभाग निरीक्षक रमेश अडगाळे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, मला मुंबईला आणण्यात आणि माझे आयुष्य घडवण्यात माझी बहीण व माझे मेव्हुणे सदानंद लांडगे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनीच मला हिंदी माध्यमातून डी. एड. करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्याकडे राहूनच मी डी. एड. कोर्स पुर्ण केला. सुरुवातीच्या काळात मी कल्याण व बदलापूर येथे खाजगी शाळेत सेवा केली. ३ फेब्रुवारी १९९२ रोजी मला मुंबई महापालिकेत शिक्षक म्हणून नोकरी मिळाली. तो दिवस माझ्या आयुष्यातील सुवर्ण दिवस होता. सन २००२ मध्ये मला उपमुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली. सन २००७ मध्ये मला मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली. गुरु गोविंदसिंग हिंदी उ. प्रा. शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम करत असताना प्रशासनाने दोन वर्षांपासून प्रभारी विभाग निरीक्षक म्हणून जबाबदारी सोपवली. मुख्याध्यापक व विभाग निरीक्षक या दोन्ही पदांचा कार्यभार मी व्यवस्थितरित्या सांभाळत आहे. अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातुन जुन्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षक ब्रिजेश उपाध्याय यांनी केले. सुत्रसंचालन मुख्याध्यापक मारुती साबळे यांनी तर शेवटी सर्वांचे आभार रवी जाधव यांनी मानले.

## पारनेरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची कार्यकारिणी बरखास्त

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात राजकीय घडामोडींना वेग देणारा महत्त्वाचा निर्णय जाहीर करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) ने तालुका कार्यकारिणीसह सर्व विभाग (सेल) बरखास्त केले आहेत. तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची पुनर्बांधणी करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बाबासाहेब तरटे म्हणाले की, हा निर्णय प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर आणि खासदार निलेश लंके यांच्या सूचनेनुसार घेण्यात आला आहे. संघटनेत नवचैतन्य निर्माण करणे, नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आणि तळागाळापर्यंत पक्ष अधिक बळकट करणे हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. या निर्णयानुसार तालुका व शहर कार्यकारिणीसह युवक, महिला, किसान सेल, डॉक्टर सेल, विधी सेल, ओबीसी सेल, अल्पसंख्याक सेल, अपंग सेल आणि सांस्कृतिक सेल या सर्व विभागांच्या अध्यक्षांसह संपूर्ण कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षात व्यापक फेरबदलाची प्रक्रिया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पत्रकार परिषदेला शिक्षक नेते रा.या.औटी, माजी सभापती किसनराव रासकर तसेच काँग्रेसचे नेते शिवाजीराव जाधव उपस्थित होते. यावेळी पक्षाच्या आगामी रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बाबासाहेब तरटे यांनी सांगितले की, लवकरच खासदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील जिल्हा परिषद गटनिहाय बैठका आयोजित केल्या जाणार आहेत. या बैठकांमध्ये पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत चर्चा होणार असून, नव्या तालुका कार्यकारणीसह विविध विभागांचे अध्यक्ष व पदाधिकारी निवडण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून,पक्षात नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार असल्याची चर्चा सुरू आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक रणनीतीसह मैदानात उतरण्याच्या तयारीत असल्याचे चित्र दिसत आहे.

# ताडोबा हे निसर्गाचे वरदान; आगरझरी - मोहर्लीला पर्यावरणीय 'मॉडेल व्हिलेज' बनवू - आ.मुनगंटीवार

## रस्ते, सौंदर्यीकरण आणि स्थानिक रोजगाराला प्राधान्य देत ताडोबाला आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर नेण्याचा संकल्प

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ.सुधीर मुनगंटीवार यांनी, 'ताडोबा हे निसर्गाचे वरदान असून आगरझरी-मोहर्लीला पर्यावरणीय 'मॉडेल व्हिलेज' म्हणून विकसित करण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पद्मापूर येथील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या पद्मापूर प्रवेशद्वाराच्या सुशोभीकरणाचे अधिकृत उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ताडोबा पर्यटन विकास, रस्ते, सौंदर्यीकरण आणि स्थानिकांना रोजगारनिर्मिती यावर भर देत ताडोबाला आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून अधिक भक्कम स्थान मिळवून देण्याचा संकल्प ही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला, उपसंचालक कुशाग्र पाठक, उपसंचालक (कोर) आनंद रेड्डी, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, उपकार्यकारी अभियंता विवेक अंबुले, शहर उपाध्यक्ष रामपाल



सिंग, माजी जि. प. सदस्य गौतम निमगडे, माजी सभापती रोशनी खान, सुरेखा थोरात, अजय सरकार, मनोज सिंघवी, श्रीनिवास जंगम, मोहर्ली सरपंच सुनीता कातकर, चोरगाव सरपंच तृणाली धंदरे, अनिता भोयर, चंद्रकांत ढोडरे, शुभम गेडाम आदींची उपस्थिती होती.

पद्मापूर प्रवेशद्वाराचे काम तसेच ताडोबाला जाणाऱ्या रस्त्याचे काम अत्यंत उत्कृष्ट, दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आले. कमी खर्चात दर्जेदार काम पूर्ण करून ताडोबाच्या पर्यटन वैभवात भर घालणाऱ्या संबंधित कंत्राटदारांचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विशेष कौतुक करत अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, अशा गुणवत्तापूर्ण कामांमुळे ताडोबाची ओळख अधिक भव्य आणि आकर्षक बनत आहे.

आगरझरी गावात रस्त्याच्या बाजूचे सौंदर्यीकरण करण्यासाठी १ कोटी ८५ लाख ६२ हजार ८४७ रुपयांचे काम करण्यात आले. यामुळे जंगलातून प्रवास करताना पर्यटकांना झाडांवरील बिबट्या, विविध पक्षी, फुलपाखरे आणि निसर्गसौंदर्याचा आनंद घेता येणार आहे. आगरझरी गावाचे नाव देशभरातील पर्यटकांच्या ओठांवर राहील, अशा दर्जेदार पद्धतीने हे काम करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी विप्लोवराज सिंघवी यांचेही अभिनंदन करण्यात आले.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रफळ सुमारे १७२५ चौरस किलोमीटर असून, संजय गांधी नॅशनल पार्कचे क्षेत्रफळ १०४ चौरस किलोमीटर आहे. नवीन ताडोबा विकसित करायचा असेल, तर महाराष्ट्राचे २३ वर्षांचे संपूर्ण बजेट खर्च करावे लागेल. त्यामुळे ताडोबा ही आपल्याला निसर्गाने दिलेली अमूल्य संपत्ती आहे. २०१४ नंतर येथे मोहर्ली गेट, गावांतील अंतर्गत रस्ते, बटरफ्लाय गार्डन यांसारखे अनेक विकास प्रकल्प राबविण्यात आले, याचाही आ. मुनगंटीवार यांनी आवर्जून उल्लेख केला.

केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन तसेच केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्र्यांना ताडोबाचा ५० आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळांमध्ये समावेश करण्याची विनंती करण्यात आल्याची माहिती ही त्यांनी दिली.

जगातील सर्वाधिक वाघ चंद्रपूर जिल्ह्यात आढळतात. वाघ हा पराक्रमाचे प्रतीक असून, 'वाघांच्या जिल्ह्याचा' आवाज कुठेही कमी पडू दिला जाणार नाही; विधानसभेतही ही गर्जना कायम राहील, असे आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

# मराठी सक्तीला मुदतवाढ मिळण्याची शक्यता; पण भाषेबाबत मुजोरी चालणार नाही

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२७, मुंबई :** रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीच्या निर्णयावरून राज्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत आज झालेल्या या बैठकीत रिक्षा आणि टॅक्सी संघटनांच्या विनंतीचा विचार करून मराठी भाषा शिकण्यासाठी मुदत देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे संकेत मिळाले आहेत. मुळात १ मे २०२६, महाराष्ट्र दिनापासून मुंबईतील रिक्षाचालकांसाठी मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय लागू होणार होता. मात्र, नव्या घडामोडीनुसार ही सक्ती तत्काळ लागू न करता काही काळासाठी पुढे ढकलण्याचा विचार सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, रिक्षाचालकांना



मराठी शिकण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत देण्याचा प्रस्ताव चर्चेत आहे. या कालावधीत कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नसल्याचेही सांगितले जात आहे. या निर्णयामुळे रिक्षाचालकांमध्ये निर्माण झालेली भीती आणि अस्वस्थता काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. रिक्षा संघटनांनी दिलेल्या संपाच्या इशाऱ्याचा ही या निर्णयावर परिणाम झाल्याचे मानले जात आहे. दरम्यान, प्रताप सरनाईक यांनी अद्याप याबाबत अधिकृत घोषणा केलेली नसून अंतिम निर्णय उद्या घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मराठी शिकणं आवश्यक आहे, त्याला पर्याय नाही. मुदत दिली तरी ती पाळून भाषा शिकली पाहिजे, असा इशाराही त्यांनी दिला. आज झालेल्या बैठकीत रिक्षाचालक प्रतिनिधींनी मंत्र्यांची भूमिका मान्य केल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान राज्य सरकारने रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी केलेल्या मराठीसक्तीला राज्यातील अनेक साहित्यिकांनी देखील पाठिंबा दर्शवला आहे. काही साहित्यिकांनी तर मराठी शिकविण्याची तयारी ही दर्शवली. याबाबत मंगळवारच्या बैठकीत संघटनांशी चर्चा केली जाणार आहे.

रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात येणार असल्याचे समजते.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठीसक्तीच्या निर्णयावर ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे. मराठी सक्तीची निर्णयाबाबत कोणतीही तडजोड करायची नाही, अशी भूमिका त्यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडल्याचे समजते. त्यामुळे या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी केवळ मुदतवाढ देण्याबाबत विचार केला जाऊ शकतो, असे परिवहन विभागाकडून सांगण्यात आले. सध्याचा परिवहन विभागाचा कायदा लक्षात घेता, मराठी न येणाऱ्या चालकांचा परवाना रद्द करण्याचा अधिकार परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना नाही. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करताना अनेक कायदेशीर अडचणी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच राज्यभरात या निर्णयाची अंमलबजावणी करायची असल्यास त्यानुसार कायद्यात बदल करण्यासाठी परिवहन विभागाला पुरेसा वेळ अपेक्षित आहे.

# कोराडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

## ग्राऊंड वाटरींग व स्वच्छता यावर भर देण्याचे दिले निर्देश; राज्यातील 3२ संघाचा सहभाग

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२७, नागपूर :** महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तर कबड्डी स्पर्धेचे आयोजन दिनांक ३० एप्रिल ते ४ मे २०२६ रोजी या कालावधीत कोराडी येथे करण्यात आले आहे. येथील सेवानंद हायस्कूलच्या प्रांगणात सायंकाळी होणाऱ्या कबड्डी स्पर्धेच्या पूर्वतयारीमध्ये कोणतीही कसर राहता कामा नये या दृष्टीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन ग्राऊंडची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत क्रीडा अधिकारी अनिल बोरावार, राज्य क्रीडा मार्गदर्शक निशांत पाटील, तहसीलदार गणेश जगदाळे, कोराडी संस्थानचे मुख्याधिकारी प्रविण लिखीतकर उपस्थित होते.

राज्याच्या क्रीडा धोरणानूसार महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी या कबड्डी स्पर्धा घेतल्या जातात. यावर्षीच्या क्रीडा स्पर्धा कोराडी येथे व्हाव्यात असा मनोदय विदर्भ कबड्डी असोशिएशनने व्यक्त केला होता. याला नागपूर जिल्हा ग्रामीण कबड्डी असोशिएशनचे अध्यक्ष संकेत बावनकुळे यांनी प्रतिसाद देत या स्पर्धा त्यांच्या सेवानंद हायस्कुलच्या प्रांगणात घेण्याचे निश्चित केले. या स्पर्धेसाठी कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये या दृष्टीने क्रीडा विभाग दक्षता घेत आहे. या परिसराची संपूर्ण स्वच्छता व्हावी यासाठी संबंधितांनी काळजी घ्यावी असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी स्पष्ट केले.

उन्हाचा वाढता त्रास लक्षात घेता खेळाडूंसह प्रेक्षकांचीही काळजी घेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. त्यांनी दिलेल्या निर्देशानूसार या स्पर्धा संपूर्ण ऊन उतरल्यावर अर्थात सायंकाळी घेण्याचे संयोजक व क्रीडा विभागाने निश्चित केले. या ठिकाणी एकूण चार ग्राऊंड कोर्ट साकारत असून प्रत्येक ग्राऊंड हे मॅटचे असेल. या ग्राऊंडची अभियांत्रिकी पातळीवर संपूर्ण दखल व काळजी घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केल्यानंतर संयोजन समितीला दिले.




याचबरोबर रात्रीचे खेळ लक्षात घेता मैदानावर पुरेशा प्रमाणात प्रकाश व्यवस्था व आवश्यक ती सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निर्देश ही त्यांनी दिले. स्पर्धेच्या ठिकाणी प्रेक्षकांना अल्पोपहाराची सुविधा उपलब्ध व्हावा, यादृष्टीने महिला बचत गटांच्या मार्फत विविध स्टॉल उभारण्यात येत आहेत.

राज्यातील मुलांमुलींचे एकूण ३२ संघ यात भाग घेत आहेत. १६ संघ हे मुलांचे तर १६ संघ मुलींचे आहेत. सर्व खेळाडूंच्या निवासाची व्यवस्था आमदार निवास येथे करण्यात आली असून त्यांच्यासाठी वाहनाची विशेष सोय करण्यात आली आहे.

# छायापत्रकार रघु राय यांचे निधन; मुख्यमंत्री यांच्याकडुन श्रद्धांजली

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२७, मुंबई :** छायाचित्रातून मानवी भावभावनांना टिपणारे आंतरराष्ट्रीय छायाचित्रकार आणि छायापत्रकार रघु राय यांच्या निधनामुळे भारतीय पत्रकारितेच्या क्षेत्रातील एका दिग्गज व्यक्तिमत्वाला



मुकलो आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात नमूद केले आहे की, रघु राय यांनी कॅमेरातून भारताच्या विकासाची गाथा छायाचित्रबद्ध केली आहे. त्यांनी भारताचा इतिहास, भारतीय जनमाणसांच्या भावना आणि भारतीयांच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी यांना कॅमेरातून पकडले. भोपाळ वायू दुर्घटना पीडितांच्या वेदनाना त्यांनी छायाचित्रांच्या माध्यमांतून जगासमोर मांडले. त्यामुळेच भोपाळ वायू दुर्घटनेकडे जगाचे लक्ष वेधले गेले. राय यांच्या अनेक कलाकृतींना आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले. त्यांनी छायाचित्रांविषयी अनेक पुस्तके लिहीली. त्यांनी टाईम, लाईफ, द न्युयार्क टाईम्स आदी प्रकाशनासाठीही काम केले. त्यांना १९७२ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांना अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले.

# थोडक्यात

## ढोकेश्वर विद्यालयाचे उपप्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी यांना पी.एच.डी.



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** ढोकेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वीरेंद्र धनशेट्टी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने राज्यशास्त्र विषयातील संशोधनाबद्दल पीएच.डी. प्रदान करण्यात आली. वीरेंद्र धनशेट्टी यांनी पारनेर तालुक्यातील राजकारणाचा चिकित्सक अभ्यास: कालखंड विशेषतः १९६० ते २०१४ या विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनामध्ये पारनेर तालुक्यातील राजकीय घडामोडी, स्थानिक नेतृत्व, निवडणूक प्रक्रिया आणि सामाजिक - राजकीय बदलांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांना प्रा.डॉ.ज्योती पापा बीडलान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. धनशेट्टी यांचे जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील, जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी तसेच जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## सुजित झावरे यांच्या हस्ते पारनेर तालुक्यातील ६०० बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे वाटप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांना गती देत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुमारे ६०० महिला व पुरुष कामगारांना प्रमाणपत्रांचे वितरण शिवसेना नेते तथा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमावेळी उपस्थित लाभार्थ्यांना मंडळाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच नोंदणीकृत कामगारांना मिळणाऱ्या सुविधा, अर्ज प्रक्रिया आणि योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रमाणपत्रामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

यावेळी बोलताना सुजित झावरे सांगितले की, पारनेर तालुक्यातील आणखी हजारो महिला कामगारांना या योजनेचा लाभ देण्यासाठी काम सुरू असून, महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी या योजनांचा व्यापक वापर केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या योजनेची व्याप्ती आणखी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या योजनेत येणाऱ्या त्रुटी बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सविस्तर निवेदन देऊन या योजनेत जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून भविष्यात शिवसेना पक्ष यासाठी कायम कार्यरत राहणार असल्याचे प्रतिपादन सुजित झावरे पाटील यांनी केले. तसेच जास्तीत जास्त कामगारांना योजनांचा लाभ मिळावा यासाठी तालुक्यातील विविध भागात विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी केली.

या उपक्रमामुळे पारनेर तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार असून, विशेषतः महिला कामगारांच्या सक्षमीकरणाला चालना मिळणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले. यावेळी पारनेर तालुका महिला अध्यक्ष कोमलताई भंडारी, जिल्हा उपप्रमुख प्रियांका खिलारी, मंगल शेंडकर, सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, शंकर बर्वे यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवी मुंबई मध्ये जिल्हा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर यशस्वी

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२७, खारघर (नवी मुंबई) :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने आयोजित जिल्हा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर डॉ.जी.के. डोंगरगावकर विधी महाविद्यालय, खारघर, नवी मुंबई येथे यशस्वीरीत्या पार पडले. सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत चाललेल्या या शिबिरात विविध विषयांवर ज्ञानवर्धक व्याख्याने झाली. कार्यक्रमाची सुरुवात प्रिया कदम यांनी डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या अभिवादन गीताने केली. डॉ.दाभोलकर, जोमाने नेऊ पुढे चळवळ या प्रेरणादायी गीताने उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला.

शिबिरात खालील मान्यवरांनी व्याख्याने दिली :-

फलज्योतिष चिकित्सा – प्रो. विवेक काशीकर (पुणे)

महाअनिस कार्यपद्धती – प्रा. प्रदीप कासुडे (नवी मुंबई जिल्हा प्रधान सचिव)

महाअनिस पंचसूत्री – अशोक निकम (नवी मुंबई)

चमत्कार सादरीकरण, माइंड रीडिंग व वैज्ञानिक दृष्टिकोन – कार्याध्यक्ष

नवी मुंबई जिल्हा कार्यक्रमाची सांगता खारघर शाखेचे कार्याध्यक्ष जितेंद्र बनसोडे यांनी सर्व उपस्थितांचे, प्रशिक्षकांचे तसेच जी के डोंगरगावकर आणि ज्यांनी या प्रशिक्षणास विविध प्रकारे सहकार्य केले अशा सर्वांचे आभार मानून केली.

शिबिरात चहा, नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि विविध विषयांवर चर्चा व प्रश्नोत्तर सत्र घेण्यात आले.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबईने सर्व व्याख्याते, उपस्थित कार्यकर्ते, प्रिया कदम, जितेंद्र बनसोडे आणि महाविद्यालयाच्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार व्यक्त केले आहेत. डॉ.दाभोलकर जोमाने नेऊ पुढे चळवळ या भावनेने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीला अधिक बळकटी देण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला.